मुळे कार्यक्षम होण्यासाठी प्रयत्न आवश्यक

डॉ. आर. जी. सोमकुंवर,
डॉ. सुजोय साहा

द्राक्ष सल्ला

गेल्या आठवड्यात द्राक्ष विभागात पावसाळी वातावरण नव्हते. बऱ्याचशा द्राक्ष बागेत फुलोरा अवस्था पार झाली असून, बागा मणी सेटिंगच्या अवस्थेत गेल्याचे दिसून येते. काही बागेत जीए-३ च्या फवारण्या व डीपसुद्धा झालेले असतील. या वेळी मात्र घडाच्या विकासाकरिता लक्ष देणे गरजेचे असेल. घडाच्या विकासात अन्नद्रव्यांचा फार मोठा वाटा असतो. या वेळी मणी फुगवणीकरिता प्रामुख्याने स्फुरदाची गरज असेल. मणी फुगवणीकरिता पाण्याची सुद्धा तितकीच गरज असेल. परंतु बऱ्याच ठिकाणी या वेळी तापमानात घट झालेली दिसून येते. रात्रीचे तापमान फारच कमी झाल्यामुळे वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालींवर त्याचे विपरीत परिणाम दिसून येतात. कमी तापमानामुळे पानांतून पाणी निघून जाण्यास अडचणी येतात. बाष्पीभवनाचा वेग कमी असल्यामुळे जमिनीतून पाण्याची गरजसुद्धा तितकीच कमी होते. घडाचा विकास होत असताना साधारणतः १४०० लिटर पाणी प्रति हेक्टर प्रति दिवस (१ मिलिमीटर बाष्पीभवनाचा वेग असल्यास) गरज असते. ही गरज पूर्ण करण्याकरिता या वेळी फक्त ठिबकद्वारे पाण्याचा वापर करावा.

आपण बागेत जे पाणी दिले त्या पाण्याचा पुरेपूर वापर होण्याकरिता मुळे कार्यक्षम असणे गरजेचे असते. काही परिस्थितीत मुळे अन्नद्रव्ये उचलण्यास सक्षम नसतात. जमिनीतून दिलेली अन्नद्रव्ये व पाणी न उचलल्यामुळे मण्याचा विकास काहीअंशी थांबलेला दिसतो. एकतर कमी झालेले तापमान व उपलब्ध असलेली मुळे या दोन्हींमुळे घडाच्या विकासावर परिणाम होताना दिसतात. बऱ्याच वेळा जमिनीत उपलब्ध असलेल्या विपरीत परिस्थितीमुळे (उदा. चुनखडी जास्त प्रमाणात असणे) महत्त्वाच्या अन्नद्रव्यांची उपलब्धता त्या वेलीला होत नाही. त्यामुळे पानाच्या वाट्या होणे, पानाच्या दोन शिरांमधील पिवळेपणा व जाळी तयार होणे, पानाचा आकार कमी होणे इ. परिस्थिती आढळून येते. याचा परिणाम म्हणजेच मण्याचा आकार वाढत नाही, कमी अधिक जाडीचे मणी (शॉट बेरीज) पाहावयास मिळतात. याकरिता मुळे कार्यक्षम करून घेणे गरजेचे असेल. या वेळी बोदाच्या बाजूने ट्रॅक्टरच्या साह्याने छोटी चारी घेता येईल किंवा कुदळीच्या साह्याने बोदावर टोचे मारून बोदातील वातावरण मोकळे राहील, अशी परिस्थिती निर्माण करावी. यामुळे पांढरी मुळे निर्माण होऊन अन्नद्रव्यांचा पुरवठा होण्यास मदत होईल. त्याचसोबत बोदामध्ये गंधक मिसळून घ्यावे. यामुळे जमिनीचा सामू थोडाफार कमी करण्यास मदत होईल. द्राक्ष बागेत या कालावधीत तापमान कमी असल्यामुळे बागेत आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. बागेत पाणी जास्त झाल्यास मुळे काळी पडण्याची समस्या राहू शकते.

फवारणीमुळे मण्यावर झालेल्या जखमा.

सनबर्निंग, देठावर गाठीची समस्या...

बऱ्याचशा बागेत १० मिलिमीटरच्या पुढे गेलेल्या घडाच्या अवस्थेत मण्यावर सूर्यप्रकाशामुळे (सन बर्निंग) डाग दिसत आहेत. याला काही बागायतदार 'उकड्या' म्हणून संबोधतात. बऱ्याचशा बागेत घडाचा साइज वाढावा म्हणून संजीवकांच्या १ पेक्षा जास्त किंवा शिफारशीपेक्षा अधिक प्रमाणात फवारणी केली जाते.

गेल्या काही दिवसांपूर्वी सतत झालेल्या पावसामुळे रोगांच्या प्रादुर्भावाची भीती जास्त होती. त्यामुळे बुरशीनाशकांच्या फवारणींचा जास्त भडिमार करण्यात आला. या अवस्थेतील मण्याच्या पेशी फार नाजूक असतात. एकतर आवश्यकतेपेक्षा जास्त फवारणी, आवश्यकतेपेक्षा अधिक रसायनाचे प्रमाण व उन्हाच्यावेळी फवारणी करणे या महत्त्वाच्या कारणांमुळे मण्यांच्या पेशींवर इजा होतात. यानंतर मणी जसा वाढत जातो व तापमान वाढण्यास सुरुवात होते, तसे मण्यावर तांबूस किंवा काळसर डाग दिसून येतात. मण्यांवर दगडाने इजा केल्यासारखे दिसून येते. हे टाळण्याकरिता संजीवकांची किंवा रसायनांची मात्रा व फवारणी गरजेनुसार करावी. ज्या वेळी वातावरणात तापमान कमी असते व आर्द्रता वाढायला लागते (५० टक्क्यांपेक्षा अधिक आर्द्रता असताना) अशावेळी फवारणी करावी. संजीवकांच्या अतिरेकामुळे बऱ्याचशा बागेत घडाच्या देठावर गाठी येताना दिसतात. या गाठीच्या आतमध्ये पोकळ भाग असोत. मण्याचा आकार वाढून वाढताना तो घड गाठीवरून तुटतो. या पोक मण्यांना अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यामध्ये अ किंवा अजिबात पुरवठा होत नाही. मग त्या उतरत नाही. तसेच पुढील काळात काही अडचणींचाही सामना करावा लागतो. याकरिता बागेत फक्त शिफारस केलेल्या संजीवकांचा वापर करणे महत्त्वाचे असते. एकदा तयार झालेली गाठ कमी होत नाही किंवा विरघळून जात नाही. मात्र पुढील काळात ही समस्या टाळण्यासाठी नत्राचा वापर थोडा वाढवून वेलीची वाढ थोडीफार पुढे सरकवल्यास गाठ कमी प्रमाणात तयार होईल किंवा पुढे होणार नाही.

मण्यांवर पडलेले डाग.

- डॉ. आर. जी. सोमकुंवर, ९४२२०३२९८८
- डॉ. सुजोय साहा, ७०६६२४०९४६
(राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि. पुणे)

रोगांचा प्रादुर्भाव ...

सांगली, सोलापूर या भागांत अजूनही डाऊनी मिल्ड्यूचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसून येतो. बऱ्याचशा परिस्थितीत बागायतदारांना नियंत्रण शक्य ल्याचे दिसून येते.

निक बाजारपेठेकरिता राखलेल्या बागेत थोमार्फ १ ग्रॅम प्रतिलिटर पाणी किंवा ...ल्ब्युरॉन १५० मि.लि. प्रति एकर याप्रमाणे फवारणी करावी. या बागेत कमीत कमी ४०० लिटर पाणी वापरले जाईल, याची काळजी घ्यावी.

- निर्यातक्षम प्रतीच्या उत्पादनाच्या द्राक्ष बागेत पोटॅशिअम सॉल्ट ऑफ ॲक्टिव्ह फॉस्फरस ४ ग्रॅम प्रतिलिटर पाणी (टँकमिक्स) याप्रमाणे फवारणी करता येईल.
- ड्रीपद्वारे ट्रायकोडर्मा व बॅसिलसचे ड्रेंचिंग दिवसाआड करता येईल. त्याचप्रमाणे या घटकाच्या ३ ते ४ फवारण्या केल्यास रोग नियंत्रण अधिक सोपे होईल.
- भुरी रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या बागेत सल्फर २ ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा ॲम्पिलोमायसिस ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करता येईल. बऱ्याचशा बागेत फवारणी केल्यानंतर रोगनियंत्रणात येतो; परंतु मण्यावर किंवा घडाच्या दांडा व देठावर विपरीत परिणामसुद्धा दिसून येतात. त्यामुळे शक्यतोवर बाजारात उपलब्ध असलेल्या वाढ उत्तेजकांचा (टॉनिक) वापर खात्री केल्याशिवाय करू नये.
- सध्याच्या परिस्थितीत बऱ्याच ठिकाणी धुके दिसून येते. यामुळे पाने जास्त वेळ ओली राहतात. अशाच कॅनॉपीमध्ये डाऊनी मिल्ड्यूचे बीजाणू पुन्हा सक्रिय होतात. याकरिता पानांची गर्दी कमी होईल, याकडे लक्ष द्यावे.

मण्यांवर झालेला रोगांचा प्रादुर्भाव.

● कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉइंट ॲग्रेस्कोप्राप्त आहेत. ● फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे. ● खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. ● बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे. ● लेबल क्लेम वाचावेत. ● पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत. ● रसायनांचा गट तपासावा. ● पीएचआय, एमआरएल तपासावेत. ● पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.

• वर्ष : १६ • अंक : ... • संपादक संचालक : आदिनाथ दत्तात्रय चव्हाण • मुद्रक, प्रकाशक व *संपादक : आदिनाथ दत्तात्रय चव्हाण • हे दैनिक सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेडसाठी मुद्रक आणि प्रकाशक आदिनाथ दत्तात्रय चव्हाण यांनी १) सकाळ प्रिंटिंग प्रेस, स. क्र. १५९/१६०, पुणे-सासवड रोड, लक्ष्मण वजनकाट्यामागे, उरुळी देवाची, पुणे - ४१२ ३०८, २) सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. एल १४, तळोजा इंडस्ट्रियल एरिया (एमआयडीसी) पाले खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र), ३) सकाळ प्रिंटिंग प्रेस, डी - ४, एम.आय.डी.सी., शिरोली, कोल्हापूर - ४१६ १२२, ४) सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेडद्वारा, विकास प्रिंटिंग अँड कॅरिअर्स प्रा. लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी., सातपूर - त्र्यंबक रोड, नाशिक - ४२२ ००७, ५) सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. सी - ३, एम.आय.डी.सी. एरिया, टेलिफोन एक्स्चेंजजवळ, औरंगाबाद रोड, जळगाव - ४२५ ००३, ६) सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ए - ११७, सेझा फाइव्ह स्टार इंडस्ट्रियल एरिया, औरंगाबाद - ४३१ ००७, ७) सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ए १९/३, एम.आय.डी.सी., चिंचोली, सोलापूर - ४१३ २५५, ८) सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, बी - ३२/३३, एम.आय.डी.सी., हिंगणा, नागपूर - ४४० ०१६, ९) सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ए/६/३/२, आरटीओ ऑफिसजवळ, एमआयडीसी धनेगाव, नांदेड ४३१६०३, १०) सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. पी ४६, एमआयडीसी फेज ४, यवत रोड, शिवणी, अकोला ४४४ ००२ येथे मुद्रित केले व सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, ५९५, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रकाशित केले. • 'अॅग्रोवन'मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी.)

पत्रव्यवहाराचा पत्ता :
अॅग्रोवन, सकाळ मिडिया प्रायव्हेट लि.
५९५, बुधवार पेठ, पुणे - ४११००२
■ दूरध्वनी : ०२०/२४४०५५००/६६०३५५०० ■ फॅक्स : २४४०५७८८
■ e-mail : agrowon@esakal.com